
# प्रकरण पहिले फलटण संस्थानाची भौगोलिक स्थिती व पूर्वइतिहास


MAP
OF THE
PHALTAN STATE.
SATARA DISTRICT.
Scale: 2 Miles to an inch
REFERENCES
Alienated Villages
Bazar Villages
Projected Railway
Village Schools
Police Stations
Co-operative Societies
Railway
Metalled Road
Canal
Unmetalled Road
Water Pipe
Gram Panchayat
Post Office
Dharamshala
Irrigation Bungalow
Dispensary
High School
Telegraph Office
Ferry.
NIRA RIVER
POONA
COLLECTORATE
SHOLAPUR
MAN TALUKA
KHATAV TALUKA
KOREGAON TALUKA
WAI
RIGHT BANK CANAL
PHALTAN
To Baramati
To Pandharpur
To Shingnapur
To Mogaralo ghat
Padegaon
Ravdi (K.D.)
Ravdi (B.K.)
Khamgaon
Nal
Jinte
Phadtarwadi
Suravdi
Nimbhore
Bhilkati
Tadvali
Korgaon
Kapadgaon
Tarodgaon
Chaudharwadi
Vithalwadi
Koleg
Bhorkad
Umbre
Aradgaon
Sasvad
Nandal
Mirgaon
Khadn
Valhor
Tarde
Hingangaon
Saipe
Kapshi
Ghadgewadi
Bibi
Vodgam
Aljapur
Vakhari
Dalawdi
Mandurkhedak
Vinchurn
Niravdi
Seskal
Bhadli
Sonavadi
Jhirapwadi
Tirakvadi
Dudhebavi
Vodle
Mirdhe
Jarli
Andrud
Barad
Kuravli (B.K.)
Rajuri
Munjavdi
Mharakwadi
Gunavre
Nimblak
Pimprad
Takalvode
Vidni
Rajale
Samanthali
Seskwadi
Kambleshwar
Sangvi
Singnapur
Sard
Sak
Gokli
Asu
Dhuluwadi
Velosi

## प्रकारण पहिले

### फलटण संस्थानचे भौगोलिक स्थिति व पूर्वइतिहास

आधुनिक भारताच्या इतिहासात सातारा जिल्ह्यातील फलटण शहर हे एक सांस्कृतिक, शैक्षणिक ,राजकियदृष्टया महत्वाचे आहे. सन 1948 पूर्वी फलटण हे एक संस्थानीकांचे राजधानीचे ठिकाण होते. फलटण संस्थान हे भारतातील एक प्राचीन संस्थान समजले जात होते,त्याची स्थापना सन 1284 मध्ये पहिल्या निंब्राज त्याने केली .सन 1284 ते 1948 पर्यन्त हे संस्थान अनेक राजकिय चढऊतार व स्थितंतरे यातुन गेले. एकंदर 25 राज्यकर्ते ह्या फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यात होऊन नेले.

17 व्या शतकात छत्रपति शिवाजी महाराजांनी हिन्दवी स्वराज्याची स्थापना केली. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी यांची पत्नी उमाबाई या फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातून आलेल्या होत्या. तर शिवाजी महाराजांची राणी सईबाई ह्या पण फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातील होत्या. तसेच नंतर शिवाजी महारांजानी आपली कन्या सखुबाई हिचे लग्न फलटणचे नाईक निंबाळकर घराण्यातील बजाजीचा मुलगा महादजी ह्याच्या बरोबर झालेले होते. या वैवाहिक संबंधावरून एक गोष्ट स्पष्ट होते कि फलटण चे नाईक निंबाळकर घराणे हे एक प्रतिष्ठित , मान्यवर आणि राजकिय दृष्टया वजनदार होते.

17 व्या 18 व्या शतकात मराठ्यांच्या इतिहासात नाईक निंबाळकर यांनी मोलाची भरीव कामगिरी केली. इ.स. 1818 ला पेशवाईचा अंत झाला आणि सर्व मराठी संस्थाने इंग्रजांचे मांडलीक बनली . साता–याला प्रतापसिंह महाराजांची छत्रपती म्हणून ब्रिटिशांनी पुर्नस्थापना केली व फलटण हे एक सातारा छत्रपतीच्या अधिपत्याखाली मांडलिक संस्थान झाले. ईस्ट इंडिया कंपनीशी 1820 ला तह करून फलटण संस्थानाचे स्थान निश्चित करण्यात आले. 19व्या शतकात इंग्रज व फलटण संस्थान यांचे संबंध मैत्रीचे व सलोख्याचे राहिले.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात फलटण संस्थानच्या आधुनिकीकरणास सुरूवात झाली व 20 व्या शतकाच्या पूर्वाधित फलटण संस्थानचे आधुनिकिरण व प्रगतीकरण पूर्ण झाले. ह्या कालखण्डात शेवटचे दोन संस्थानचे अधिपती एक मुधोजीराव (1859–1916) , दूसरे शेवटचे अधिपती मालोजीराव (1916–1948 ) हे होउुन गेले. त्यांनी फलटण संस्थानची सर्वांगीण प्रगती केली व मुंबई प्रांताच्या इतिहासात फलटण संस्थानला प्रतिष्ठित स्थान मिळवून दिले.

म्हणून "20 व्या शतकातील फलटण संस्थान " ह्या विषयावर मी हा लघु–शोध प्रबंध लिहण्याचा नम्र प्रयत्न करीत आहे. ह्या विषयावर प्रामुख्याने फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकिय अहवाल, फलटण संस्थानचे गॅझेट, फलटण संस्थानचा पत्रव्यवहार, जमाबंदी कागद इ. मुळ साधनांच्या इतर अनुशंगिक दुय्यम साधने उपलब्ध आहेत त्या सर्वांचा उपयोग करून हा शोध–प्रबंध सादर करीत आहे.

फलटण संस्थानचा इतिहास पाहण्यापूर्वी त्याचे भौगोलिक स्थान हवामान पाहणे गरजेचे आहे. कारण भौगोलिक परिस्थितिचा इतिहासावर फार मोठा परिणाम होत असतो.

फलटण संस्थानांचे भौगोलिक स्थान व विस्तार

13 व्या शतकात फलटण संस्थानची स्थापना पहिला निंबराज याने केली. फलटण संस्थान $17^{0}.49$ आणि $18.6^{0}$ उत्तर अकांश व $74.^{0}43$ पूर्व रेखांश यामध्ये विस्तारलेले होते[1] . मुंबई प्रांताच्या सातारा जिल्याच्या ईशानेस हे संस्थान होते. संस्थानाच्या सिमा उत्तरेस नीरा नदी व पुणे जिल्याची सरहद्द तर पूर्वेला सोलापूर जिल्याची सरहद तर दक्षिणेस शंभु महादेवाचा डोंगर व साता–याची सरहद्द , पश्चिमेस सातारा जिल्याची सरहद्द , संस्थानचा प्रदेश प्रामुख्याने निरा नदीच्या खो–यात वसला असून त्याची लांबी 32 मैल व रूंदी 14 मैल होती. एकंदर संस्थानची व्याप्ती 397 चौ. मैल होती[2] .

---

1 फलटण संस्थानाचा वार्षिक प्रशासकिय अहवाल वर्ष 1935–36 – पृ. 1 .

2 कित्ता .

फलटण संस्थानच्या राजधानीचे ठिकाण फलटण शहर असून ते 17$^{0}$.55 उत्तर अक्षांश व पूर्व रेखांश 74$^{0}$.26 या ठिकाणी वसलेले आहे. फलटण शहर हे महाड पंढरपूर रस्त्यावर वसले असून साता-याच्या ईशानेस 47 मैलावर आहे तर पुण्याच्या अग्नियेस 65 मैलावर आहे. लोणंद हे जवळचे 17 मैलावर असलेले दक्षिण मध्य रेल्वेचे ठिकाण आहे"[3] संस्थानच्या दक्षिणेस व अग्नियेस अनेक लहान मोठे डोंगर असुन अनेक ठिकाणी जमीन सुपीक तर अनेक ठिकाणी खडकाळ आहे. पाऊस बेताचा पडत असून संस्थानच्या पश्चिमेकडील भाग दुष्काळी आहे. जमीन ही प्रामुख्याने काही ठिकाणी सुपीक आणि ब-याच ठिकाणी नापीक आहे. संस्थानाच्या पूर्वेस प्रसिध्द शंभु महादेवाचा डोंगर असून महाराष्ट्रातील बरेच भाविक शंभु महादेवाचे दर्शनास जाताना जे प्रामुख्याने फलटण मधुनच जातात .संस्थानात हिंदु व मुस्लीम ,जैन इ. सर्वधर्माचे लोक पूर्वीपासून गुण्यागोविदाने व समभावनेने राहतात. शेती हा संस्थानातील प्रमुख व्यवसाय तर शेतीबरोबर पशुपालन ,मेंढपाळ या संस्थानातील लोक करीत होते. फलटण हे मध्ययुगात शेंगा ,गुळ ,ज्वारी, कडधान्ये इ. साठी व्यापार पेठ म्हणून प्रसिध्द होते. 1890-91 च्या फलटण संस्थानच्या प्रशासकिय अहवालात फलटण संस्थानच्या व्यापारासंबंधी पुढील माहिती आलेली आहे. " फलटण संस्थानात प्रामुख्याने रेश्मी व सुती कापड हातमागावर तयार होत असे ,धोतरजोडी ,उपरणी, लुगडी व करडी तेल. गुळ .गहू. ज्वारी, देशी कापड ,कांबळी इ. वस्तु संस्थानातून निर्यात होत असे तर तलम कापड व मसाल्याचे पदार्थ संस्थानात आयात केले जात होते[4]"सातारा,पुणे येथील व्यापारी तसेच गुजरातमधील कांही मारवाडी व्यापारी व्यापारासाठी फलटण मध्ये स्थाईक झालेले दिसतात. मध्ययुगीनकालात फलटण हे एक भरभराटीचे व्यापारी केंद्र होते.[5]

लोकसंख्या

फलटण संस्थानची लोक संख्या प्रामुख्याने मराठी भाषिक होती व त्यात शेतकरी मोठया प्रमाणात दिसतात. दर 10 वर्षानी खानेसुमारी करण्याची पध्दत इग्रंजानी सुरू केली ती संपूर्ण भारतभर व सर्व संस्थानात लागू केली,त्यास अनुसरूण फलटण संस्थानची दर 10 वर्षानी खाणेसुमारी झालेली आहे. त्यावरून स्त्रिया किती ,पुरूष किती याची कल्पना येते. लोकसंख्या कशी वाढत गेली याची पण माहिती मिळते म्हणून मी नमुन्यादाखल कांही वर्षाची लोकसंख्याचा तक्ता अभ्यासकांच्या माहितीसाठी देत आहे:[5]-

---

3 Satara Gazetteer -Gazetteer of the Bombay Presidency Vol.XIV ed. of 1885 P.231.

4 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकिय अहवाल सन 1890-91 -पृ.2

5 फलटण संस्थानाचा प्रशासकीय अहवाल वर्ष 1899-1900- पृ.2.

| वर्ष | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| 1872 | 29,199 | 29,203 | 58,402 |
| 1971 | 27,929 | 28,031 | 55,960 |
| 1921 | 21,407 | 21,879 | 43,286 |
| 1931 | 29,492 | 29,269 | 5 87,61 |

सर्वसाधारण संस्थानी जनता दारीद्रयात होती कारण शेती ही पावसावर अवलंबून होती. शेतकरी अशिक्षित होता म्हणून दुसरे उद्योग करीत असे. 1899-1900 च्या वार्षिक अहवालात पुढील वृत्तांत दिला आहे.

"Agriculture being chiefly dependent on rainfall which is mostly scanty and precarious in this part of the country it is certainly desirable that a portion of the people should engange in other trades and industries but having regard to the tendencies and capacities of the people the economic condition of the country and the present state of industrial arts and manufactures it does not seem that change thought greatly desirable is possible for many years to come "[8]

6 इम्पिरीयल गॅझेट ऑफ इंडिया 1886 – पृ. 164

7 फलटण संस्थानाचा प्रशासकिय वार्षिक रिपोर्ट 1934-35 – पृ.2

8 A.R. of Phaltan State year 1899-1900, p.2.

ही परिस्थिति सुधारण्यासाठी संस्थानधिपत्तीनी संस्थानात विहीरी ,तलाव काढलेले आहेत,तसेच निरा उजवा कालवा संस्थानातुन गेल्याने शेतक–याची आर्थिक स्थिती नंतर सुधारलेली दिसते.

<u>संस्थानातील गावे व त्यांची नावे</u>

| अ.नं. | गावाचे नाव | अ.नं. | गावाचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | मौजे मिरगाव | 21 | मौजे निरगुडी |
| 2 | मौजे दालवडी | 22 | मौजे दुधेवावी |
| 3 | मौजे काळज | 23 | मौजे अदरकी बुद्रूक |
| 4 | मौजे नांदल | 24 | मौजे तडवले |
| 5 | मौजे अंदरूड | 25 | मौजे कुसुर |
| 6 | मौजे मलवडी | 26 | मौजे आळजापुर |
| 7 | मौजे जिंती | 27 | मौजे कापसी |
| 8 | मौजे सासकल | 28 | मौजे टाकळवाडे |
| 9 | मोजे कुरवलीबुद्रूक | 29 | मोजे मांडवखडक |
| 10 | मौजे सोळगांव | 30 | मौजे साठे |
| 11 | मौजे वाघोशी | 31 | मौजे विचुर्णी |
| 12 | मौजे सुरवडी | 32 | मौजे खामगाव |
| 13 | मौजे तावडी | 33 | मौजे कापडगाव |
| 14 | मौजे मुरूम | 34 | मौजे शिरकवाडी |
| 15 | मौजे सोमंथळी | 35 | मौजे सोनवडी खुर्द |
| 16 | मौजे सालपे | 36 | मौजे निंभारे |
| 17 | मौजे सोनवडे बुद्रूक | 37 | मौजे वडजल |

---

9 फलटण संस्थानचे पॅलेस रेकॉर्ड

| अ.नं. | गावाचे नाव | अ.न. | गावाचे नाव |
|---|---|---|---|
| 18 | मौजे अदरकीखुर्द | 38 | मौजे सासवड |
| 19 | मौजे सरडे | 39 | मौजे कोपर्डे |
| 20 | मौजे हिंगनगाव | 40 | मौजे को–हाळे |
| 41 | मौजे वडगाव | 61 | मौजे ढवळ |
| 42 | मौजे जावळी | 62 | मौजे वाखरी |
| 43 | मौजे वेळोशी | 63 | मौजे गिरवी |
| 44 | मौजे खडकी | 64 | मौजे वडले |
| 45 | मौजे मिरढे | 65 | मौजे उपळवे |
| 46 | मौजे कुरवली बु. | 66 | मौजे तरडगाव |
| 47 | मौजे गुणवरे | 67 | मौजे बीबी |
| 48 | मौजे कांबळेश्वर | 68 | मौजे सांगवी |
| 49 | मौजे तरडफ | 69 | मौजे पिंपरद |
| 50 | मौजे गोखळी | 70 | मौजे वाठार |
| 51 | मौजे मुंजवडी | 71 | मौजे आसू |
| 52 | मौजे बरड | 72 | मौजे झाडळी बु. |
| 53 | मौजे राजाळे | 73 | मौजे खुंटे |
| 54 | मौजे राजुरी | 74 | मौजे निंबळक |
| 55 | मौजे रावडी बु. | 75 | मौजे रावडी खुर्द |
| 56 | मौजे बिलकटी | 76 | मौजे भाडळी बुद्रूक |
| 57 | ताथवडा | 77 | मौजे पाडेगाव |
| 58 | मौजे आरडगाव | 78 | मौजे होळ |
| 59 | मौजे तांबवे | 79 | मौजे वीडणी |
| 60 | मौजे कोरेगाव | 80 | परगणे फलटण |

-----

## फलटणचा प्राचीन इतिहास

प्राचीन वाड्.मयात फलटणचा उल्लेख "पळयठाण" असा आलेख आहे. गावात काही पुरातन मंदिरे असून जी फलटणच्या प्राचीनतेची जाणीव करून देतात त्यात जबरेश्वर ,रामेश्वर , माणकेश्वर, ाजटेश्वर व बाजारातील विठ्ठल मंदिराच्या बाजुस असलेले शिवमंदिर ,श्रीराम मंदिर , शिंगंगापुर रस्त्यालगतचे नरसोबाचे मंदिर इत्यादि मंदिराचा समावेश होतो. फलटणास महानुभाव पंथाची काशी असे म्हणतात. महानुभाव धर्मियांची मठ मंदिरे येथे असून पंजाब व देशाच्या इतर भागातुन भाविक दर्शनासाठी येतात.[10]

फलटण भागाचा प्राचीन इतिहास गौरवशाली आहे. फलटण संबंधी कांही आख्यायिका व दंतकथा उपलब्ध आहेत. त्यातील एक महत्वाची आख्यायिका प्रभु रामचंद्र व फलटणनगरी या संबंधी आहे. फलटणची भुमी दंडकारण्य प्रदेशात नावाजलेली होती. सीतेस तहान लागली असता श्रीरामाने बाण मारून भुमीतून पाणी काढले. हीच बाणगंगा नदी होय. अशी पारंपारिक समज आहे. ज्या ठिकाणी भुमितुन पाणी काढले किंवा बाणगंगेचा जेथे उगम आहे तो डोंगर सीतामाईचा डोंगर म्हणून ओळखला जातो. बाणगंगेच्या तीरावरच फलगुऋषींचा आश्रम होता. त्यावरून फलटण असे नांव या नगरास पडले असे म्हणतात.[11]

फलटणच्या दक्षिणेस शंभु महादेव डोंगर रांगेवर दोन दुर्ग बसलेले आहेत. दक्षिणेस वारूगड तर पश्चिमेस संतोष उर्फ किल्ले ताथवडा होय.

फलटण व फलटणच्या सभोवतालच्या भागावर इ.स. पूर्व तिसरे शतक ते इ.स. 12 व्या शतका पर्यन्त मौर्य ,सातवाहन ,वाकाटक , बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट , कल्याणी चे चालुक्य, सिलाहार व देवगिरीचे यादव यांचे राज्य होते. हे त्या भागात दिसणा-या कांही ऐतिहासिक अवशेषावरून ,शिलालेखावरून दिसते. यादव कालीन कांही हेमाड पंथीय देवालये फलटण व आसपासच्या भागात दिसतात. खुद्द फलटण येथील जबरेश्वराचे मंदिर पाहिले तर त्याचे बांधकाम हेमाड पंथीय व यादवकालीन आहे हे ताबडतोब लक्षात येते. तसेच फलटण शहरातील कांही जैन मंदिरे प्राचीन काळातील दिसतात. कदाचित 11 व्या शतकात शिलाहारांचे राज्य कोल्हापूर , सातारा,क-हाड या भागांवर होते, त्यावेळी काही जैन धर्मिय फलटणला राहात असत व शिलाहारांच्या राजाश्रयाने ती मंदिरे बांधली असावीत.[12] .

---

10 पावशे अ.ब. – विकास षठमासिक फलटण 1936– पृ. 34.

11 कित्ता ,

12मिरासी वि.वी. – शिलाहार घराण्याचा इतिहास व कोरीव लेख – पृ.3–5 .

## फलटण राजधानीचे ठिकाण –

फलटण हे फलटण संस्थानच्या राजधानीचे ठिकाण मध्ययुगीनकालात होते तर आज सातारा जिल्ह्यातील एक तालुक्याचे प्रमुख ठिकाण आहे. पूर्वीच्या फलटण संस्थानचे वैभवाची साक्ष देणा–या अनेक ऐतिहासिक इमारती ,नाईक निंबाळकरांचा मनमोहन राजवाडा, लक्ष्मी पॅलेस इ. वास्तु आजही दिमाखाने उभ्या आहेत. आणि फलटणच्या गतवैभवाची साक्ष देतात. फलटण या राजधानीच्या नगराची स्थापना इ.स. 1330 ला दुसरा निंबराज याने केली.[13] निंबराज दुसरा याची कारकिर्दी इ.स. 1327 ते 1345 अशी होती. फलटण नगर जहागिरीचे मध्यवर्ती ठिकाण असून हवामान कोरडे व आल्हाददायक होते. तसेच कोंकण आणि देश यांच्यामधील मध्ययुगीन कालातील एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. शहराला पाणी पुरवठा सुव्यवस्थीत होतो म्हणून नाईक निंबाळकरांनी फलटण शहराची स्थापना सुरक्षित ठिकाणी करून राजधानीभोवती तटबंधी बुरूज खंदक काढले होते, एकंदरीत मध्ययुगीन काळात फलटण आदर्श राजधानीचे ठिकाण केले होते, ते पुढे मुधोजीराव व मालोजीराव यांच्या कारकिर्दीत एक औद्योगिक सांस्कृतिक आणि एक प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून सुप्रसिध्द झाले.

## फलटण संस्थानाचा ऐतिहासिक आढावा ( थोडकयात ) –

फलटण संस्थानात एकंदर 84 गावे समाविष्ठ होती म्हणून त्यास चौ–याऐंशी फलटण असे ऐतिहासिक कागदपत्रात म्हटले जाते. परंतु फलटण संस्थानाची खरी प्रगती व विकास 19 व्या शतकाच्या उत्तरार्धापासून म्हणजेच मुधोजीरावांच्या कारकिर्दी पासूनच सुरू झाला. हे छोटेसे पण महत्वपूर्ण संस्थान कसे उदयास आले याचा मागोवा घेणे हे ह्या ठिकाणी अप्रस्तुत होणार नाही कारण त्याची निर्मिती ही अतिशय मनोरंजक व उद्बोधक अशी आहे म्हणून या ठिकाणी मी 1284 ते 1853 पर्यन्त थोडक्यात आढावा घेत आहे. 1933 च्या खानेसुमारी नुसार फलटण नगरीची लोकसंख्या 69 47 होती पैकी 3521 पुरूष व 3426 स्त्रिया होत्या.[14]

---

13 फलटण संस्थान वार्षिक अहवाल – सन 1934–35 – पृ. 2 .

14 1931 चा खानेसुमारी अहवाल फलटण तहसिलदार कार्यालय –

शिवपूर्वकालातील महाराष्ट्रात जी जुने ऐतिहासिक घराणे होउन गेली त्यात फलटणच्या नाईक निंबाळकरांचा समावेश होतो. सुरूवातीला चौ–याऐंशी गावांचे संस्थान लहान असले तरी मानाने मोठे होते. फलटण संस्थानाची स्थापना कशी झाली ते पाहणे या ठिकाणी योग्य आहे. फलटणचे नाईक निंबाळकर घराण्याची राजकिय सत्ता जवळ जवळ 664 वर्षे अबाधित राहिली. या राजघराण्यात एकंदर 25 राज्यकर्ते होउुन गेले . मध्ययुगीन काळात व आधूनिक काळात अनेक राजकिय चढ–उतार या घराण्याने पाहिले म्हणून याठिकाणी मुधोजीपूर्व इतिहास थोडक्यात देत आहे.

<u>फलटण संस्थानची स्थापना – इ.स. (1284)</u> –

9व्या शतकात मध्यभारतात परमारवंशीय रजपुत राजाने धार येथे राज्य स्थापन केले. या घराण्यात अनेक शुर व पराक्रमी राजे होउुन गेले परंतु त्या हिंदु राजावर पुढे 12 व्या शतकात दिल्लीच्या सुलतानाने अनेक हल्ले केले म्हणून काही रजपुत घराणे उत्तरेतून भारतात आपले नशीब कमविण्यास आले अशाच घराण्यापैकी एक घराणे म्हणजे नाईक निंबाळकरांचे घराणे होय. या घराण्याचा मुळपुरूष निंबराज (पहिला) परमार नावाचा एक पुरूष दक्षिण भारतात फलटण शेजारी शंभु महादेवाच्या जंगलात इ.स. 1270 च्या सुमारास आपल्या कांही निवडक सहका–यासह आला व राहिला. सुरूवातीला निंबराज ज्या गावी राहिला त्यास निंबळक आणि त्यावरूनच त्याच्या घराण्यास व वंशास निंबाळकर असे नाव पडले . त्यापूर्वी त्या घराण्याचे नाव पवार असे होते."[15] . 1934–35 च्या अहवालात या संबंधीची मुळ माहिती इंग्रंजी मध्ये महत्वाची असल्याने ती थोडक्यात पुढील प्रमाणे,"

" The state is one of the oldest in the Deccan dating its origin as far back as the middle of the 13th centry. Nimbraj I, a descendant of the reputed Rajput Parmar ( Known in the Deccan as Power ) Clan came down to the Deccan from the North in the year 1270 at the foot of the Shambhu - mahadev range; as offshoot of the Sahyadri mountains. After a time he; finally seffted at Nimbalk ( a village about 9 miles to the east of Phaltan ) from which the Surname of

---

15 फलटण संस्थान वा.प्र.अहवाल – सन 1934–35 – पृ.2–3 .

Nimbalkar is taken "[16]

यावरून निंबाळकर हे पूर्वीचे रजपूत घराणे असून त्याने अनेक लढाया करून उत्तर भारतात राज्य स्थापन केले होते असे दिसते ते पूर्वीपासूनच शूर, लढाउ व मातब्बर रजपूत सरदार होते.

हा निंबराज पहिला याने जवळजवळ अकरावर्षे त्या भागात कायदा व सुव्यवस्था स्थापन करून आपली जहागिर निर्माण केली इ. स. 1284 ला निंबराज ने फलटण संस्थानची स्थापना करून पुढे 1291 मध्ये त्याचे निधन झाले. त्यानंतर त्याचा शुर मुलगा पोडखल जगदेवराव उर्फ धरपतराव (1291 ते 1327 ) हा राज्यकारभार करू लागला Podakhala alias Dharapatrao दिल्ली सुलतान महमंद तघलक ( 1325 ते 1351 ) या सुमारास महाराष्ट्रात येउन देवगिरी उर्फ दौलताबाद येथे भारताची राजधानी केली होती. पोडखल हा 1327 ला याच दरम्यान महंमद तघलकाच्या नोकरीत हजर आला. आणि त्याच्या वतीने अनेक मोहिमेत भाग घेतला . युध्दातच पोडखल हा मारला गेला. त्यानंतर त्याचा मुलगा निंबराज दुसरा (1327 ते 1349 )त्याला महंमद तघलकाने सरदारकिची वस्त्रे दिली. फलटणची जहगिरीची सनद करून दिली. त्याबरोबर "नाईक" ( Naik ) हा मानाचा परंपरागत किताब बहाल केला व " मोरचेल" ( Morchels ) वापरण्याचा हक्क दिला तसेच सोन्याचा तोडा दिला. त्यावरून तयाचा राजदरबारात मानमराबत वाढला. येथुनपुढे नाईक निंबाळकर असे त्या घराण्याला नाव पडले "[17]

---

16 कित्ता –

17 Gazetteer of the Bombay Presidency Vol.XIX ed.of 1885 the Satara Gazetteer States at page 231.

पुढे नाईक किताब निंबाळकर घराण्याने कायमपणे आपल्या नावापुढे लावला. "राजा" हा किताब कमी उपयोगात आणला. अशारीतिने फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्याची ऐतिहासिक स्थापना महमद तघलकाच्या काळात झाली हे सिध्द होते. ह्या घराण्यात संस्थानाधिपती म्हणून खालील राज्यकर्ते होऊन गेले त्याची यादी पुढीलप्रमाणे --

<u>निंबाळकरांचा प्राचीन वंश</u> –

1 मुळ पुरूष निंबराज परमार (इ.स.1288 ते 1291 )

2 जगदेवराव उर्फ धारापतराव उर्फ पोडरवल(1291 ते 1327 )

3 निंबराज ( इ.स. 1327 ते 1349 )

4 वणगभूपाल (इ.स.1349 ते 1374 )

5 वणंगपाल (इ.स. 1374 ते 1400 )

6 वणगोजी (इ.स. 1400 ते 1430 )

7 मालोजी पहिला ( इ.स. 1430 ते 1435 )

8 बाजीसाहेब ( इ.स. 1435 ते 1465 )

9 पवारराव नाईक (इ.स. 1465 ते 1480 )

10 बाजी नाईक ( इ.स. 1480 ते 1512 )

11 मुधोजी नाईक (इ.स. 1512 ते 1527 )

12 बाजी धारराव (इ.स. 1527 ते 1560 )

13 मालोजी दुसरा (इ.स. 1560 ते 1570 )

14 जगपाग्राव उर्फ वणगोज ( इ.स. 1570 ते 1630 )

15 मुधोजी ( इ.स. 1630 ते 1644 )

16 बजाजी ( इ.स. 1644 ते 1676 )

17 वणगोजी–तिसरा ( इ.स. 1670 ते 1693 )

18 जानोंजी ( इ.स. 1693 ते 1748 )

19 मुधोजी तिसरा (इ.स. 1748 ते 1765 )

20 आईसाहेब मुधोजी पत्नी रिजंट 1765 ते 1767

21 सोयराजी ( इ.स. 1767 ते 1774 )

22 मालोजी तिसरा ( इ.स. 1774 ते 1777 )

जानोंजी ( इ.स. 1777 ते 1825 )

राणी सगुणाबाई आईसाहेब मुधोजी तिसरा पत्नी रिजंट (इ.स. 1777 ते 1791 )

23 बजाजी दुसरा ( इ.स. 1827 – 1828 )

राणी साहेबजी उर्फ बयासाहेब जानोजीची पत्नी रिजंट ( इ.स.1841–1853 )

24 मुधोजी चौथा उर्फ बापूसाहेब ( इ.स. 1860 ते 1916 )

25 मालोजी उर्फ नानासाहेब ( इ.स. 1916–1948 )

फलटण राज्याची स्थापना कशी झाली त्याची मनोरंजक माहिती डि.बी. पारसनीस यांनी आपल्या इतिहास संग्रह या मासिकात " ऐतिहासिक चरित्रे व ऐतिहासिक टिप्पणी या सदराखाली सविस्तर दिले आहे. ती अभ्यासकांना उपयुक्त असल्याने याठिकाणी मी थोडक्यात देत आहे. ती पुढीलप्रमाणे ; – "सुर्यवंशी परमार कुळातील राजघरणेदार यातील एक पुरूष निंबोदा उर्फ निंबराज (पहिले) पवार याने शिगणापुरनजीक निंबाचे झाडीत सन 1270 पासून पुढे अकरा वर्षे उग्र तपश्चर्या केली. तेव्हा देवी प्रगट होउन दर्शन दिले आणि पोरचले दिले. पुढे याची किर्ती ऐकूण पुष्कळ लोक जमले व दिल्लीचे सैन्य येउन एक वर्षाने त्यास मिळाले. नंतर चार वर्षानी अनागोदिचे किरटी रामराजाशी युध्द झाले. त्यात त्याचा पराजय झाला. पुढे एक वर्षानी त्याने कैलासवास केला. त्यास पुत्र जगदेवराव उर्फ धारापतराव नावाचा होता, दिल्लीचा सरदार मलीक–उल–मिजार याने नर्मदे अलिकडे येऊन मुलखाचा बंदोबस्तास धारापता यास सहाय्य सह 1287 अशर सबा यात करून घेऊन आपण दिल्लीत गेला. धारापत मुडाई, झोडी–धाडी करीत असत त्यावेळी दिल्लीत अल्लाउद्दीन बादशहा होता. त्याने नंतर तीन वर्षानी पराक्रम पाहून सरदारी व तैनातीस बारा हजार स्वार दिले. नंतर अदमासे पंधरा वर्षानी आपला चिंरजीव निंबराज यास बरोबर घेऊन दिल्लीस जाऊन तेथे पंजाबचे लोकांशी युध्द करून त्यास मरण पावले ते बादशहाने पाहून त्यास तुम्ही पुन्हा सपरास जाऊ नये असे सांगितले . तरी ते न ऐकता युध्दात जाऊन मरण पावले. त्यामुळे तयाचे चिरजीव निंबराज दुसरा यांचा सर्व सरदारासमक्ष बहूमान करून बादशहा मुहम्मद तुघलक याने इ.स. 1327 मध्ये वस्त्रे दिली व नाईक किंताब देऊन वतन जहागिर साडेतीन लक्षाची दिली व डंका वगैरे राजोपभोगाची वस्त्रे दिली. नंतर मानाची सनद घेऊन निंबळकास आले. पुढे फलटण ची वस्ती तीन वर्षानी चांगली केली. वेशी व तट बांधिला पुढे अजमासे सहा वर्षानी याचे पदरचे चौथे व कुळे या लोकांनी खजिना लुटला त्यास घरून त्यांनी कैद केले. नंतर एक वर्षानी निंबराज यास पुत्र झाला. त्याचे नाव वणगभुपाल ठेविले. तेव्हा कैदी बंधूमुक्त केले पुढे ते आठ वर्षानी

बाळ राज्य करून परलोक गेले. त्याचे अगोदर फलटण येथे देवीचे देऊळ बांधिले .चौथे व कुचे व मुक्तबोध यांनी बिदरचे सुभेदार अनुकूल करून सैन्य जमवुन भोजनाचे वेळेस मारा करून नायकाच्या मेडळीस मारून टाकिले. त्यावेळेस ( नायकाची ) तिसरी बायको जयवंतीबाई याना आपले सहा महिन्याचे मुल घेऊन गुप्तपणे बाहेर पडून शिंप्याचे घरी जाऊन राहिली. येथुन काही लोकांच्या सहायुयाने निंबोडी येथे वंजारी कारभारी याचे घरी नेऊन ठेविले. त्यानंतर शत्रुच्या भयास्तव जाळोली कोळीळा येथे बाई व मुलास बाळोजी पाटील ठगे यांचे घरी ठेविले"[18] पुढे ते मूल म्हणजेच वणंगपाल याने लोक जमऊन गुप्तपणाने फलटणात शिक्षण चौथे कुचे, मुक्तबोध यांचे सर्व लोक मारून आपले राज्य परत घेतले हा प्रकार इस. 1390 मध्ये झाला. वणंगपाल राज्य करू लागले. सर्व लोक आनंदीत झाले. त्यांनी नजराणे दिले. पुढे त्यांनी आपले आईस फलटणास आणिले. सर्व लोकांना पोशाख देऊन मार्गस्थ केले. नंतर वणंगपाल यांनी दिल्लीस बादशाहस भेटुन आमचे राज्ये जुडोनी घेतले ते आम्ही परत हस्तगत करून घेतले असे कळविले. त्यानंतर त्यास पोशाख परमाना दिला.[19] नंतर दोन वर्षानी पोटसुळाच्या आजाराने त्यांचे 1394 ला निधन झाले.

नंतर त्याचे चिंरजीव वणगोजी पहिले हे गादीवर आले व त्यांनी 1394 ते 1409 पर्यन्त राज्य कारभार केला. त्यांच्या कारकिर्दीत दुर्गादेवीच्या नावे 12 वर्षाचा दुष्काळ पडला. दुष्काळात रयतेस तगई व इतर सवलती देऊन त्याने संगोपण केले हेच वणगोजी पहिले होत.

1394 पासुन ते 1630 पर्यन्त पुढील नऊ [20] नाईक (फलटणचे सत्ताधीश ) होऊन गेले,त्यांनी फलटणचा राज्यकारभार केला. त्याच्या संबंधी काहीच माहिती मिळत नाही. ते पुढीलप्रमाणे

1 वणगोजी ( 1394 ते 1409 )
2 मालोजी पहिला ( 1409 ते 1420 )
3 बाजी ( 1420 ते 1445 )
4 जोवा ( पवारराव ) ( 1445 ते 1470 )

---

18 पारसनीस डी.बी. – ऐतिहासिक चरित्रे व ऐतिहासिक टिपणे इतिहास संग्रह – पृ.24
2 कित्ता
20 फलटण संस्थानाचा प्रशाकिय अहवाल– 1934–35 – पृ. 3

5 बाजी ( 1470 ते 1512 )

6 मुधोजी ( 1512 ते 1527 )

7 बाजीधरराव (1527 ते 1560 )

8 मालोजीराव दुसरा ( 1560 ते 1570 )

9 वणगोजी उर्फ जगपालराव ( 1570 ते 1630 )

ह्यामधील मालोजी दुसरा ( 1560 ते 1570 ) हा विजापूरच्या सेवेत असताना विजापूरकर व विजयनगर यामधील 1565 ला सुप्रसिध्द तालीकोटची लढाई झाली. ह्या लढाईत हा मराठे सरदार आदिलशाहीच्या बाजूने लढलेला दिसतो व हा लढाईत विजयनगरच्या रामराया याचा पराभव झाला आणि शाहींना विजय मिळाला म्हणून मालोजी दुस–यावर आदिलशहा खुष झालेला दिसतो.[21]

<u>फलटणचे नाईक निंबाळकर व भोसले घराणे</u>–

हिन्दवी स्वराज्याची स्थापना छ. शिवाजी महारांजानी केली. हे जरी सत्य असले तरी शिवाजीच्या पूर्वजांना निंबाळकरांनी सहकार्य करून प्रतिष्ठा कशी मिळवून दिली हे खालील माहिती वरून दिसते.

जगपाळराव ऊर्फ नणगोजी नाईक दुसरे ( इ.स. 1570 ते 1630 ) मालोजी नंतर गादीवर आले. जगपालराव नाईक हा शुर धाडसी व फौजबंद होता. इ.स. 1569 मध्ये वीस वर्षाचा असतानाच तो फलटणचा राज्यकारभार पाहू लागला . हिंगणी बेरडी चे भोसले दरसाल चैत्रात शंभु महादेवाचे यात्रेस नियमाने जात असत. रस्त्यात त्यांचा मुक्काम फलटणास निंबाळकराकडे होई. एकदा बाबाजी भोसले व त्याचे दोघे मोठे मुलगे मालोजी व विठोजी यांनी रोजगाराच्या निमित्ताने जगपालरावांची भेट घेतली. जगपालराव व मालोजी हे समवयाचे होते. भोसले बंधुची इभ्रत जवानी व हिम्मत पाहुन त्या उभयतांस जगपाळरावाने आश्रयमदरी बाराशे होनांची असामी दिला. त्यापुर्वी मालोजी हा देवगिरीस जाधवांचे पदरी लहानशी नोकरी करत होता. निंबाळकराने त्यास ,उभयतांना नोकरी दिली त्यामुळे त्यांचा ऋणानुबंध

---

21 सरदेसाई गो.स. मराठी रियासत – पृ. 135

वाढला व भोसल्याचे महत्व वाढले. जगपाळराव आजुबाजूस प्रदेश वाढवित होता. त्याकामी त्यास मालोजी व विठोजीचा चांगला उपयोग झाला असे सांगतात कि इ.स. 1590-98 च्या सुमारास जगपाळरावाची फौज कोल्हापूराकडील काही प्रांत जिकींत असता त्याजवर आदिलशहाची फौज घालुन आली. लढाई झाली तीत भोसले बंधुनी जिवाची पर्वा न ठेवता शौर्य प्रगट करून जगपाळरावांची बाजू संभाळली. त्यामुळे भोसल्याचा लौकिक विजापूर दरबारात पसरला व हा लौकिक निजामशाहीत गेल्यावर त्यांची तेथील वतने जप्त होती ती मोकळी करून त्यास परत दिली व राजे हा किताब दिला. तेव्हा हे भोसले बंधु परत निजामशाहीत दाखल झाले. याप्रमाणे भोसल्याचा भाग्योदय झालेला पाहुन जगपाळरावाने आपली उपवर बहिण मालोजीस दिली. हीच शहाजीची आई दिपाबाई होय. भोसल्यांचे कुळ उच्च आहे आणि निंबाळकर जसे परमार घराण्यातून दक्षिणेत आले. तसेच भोसले हे केव्हा तरी उदयपुरच्या घराण्यातून इकडे आलेले असावे अशी निंबाळकरांची खात्री होती, मात्र निंबाळकरांशी शरीर संबंध आल्यामुळे भोसल्याचा लौकिक वाढला आणि निंबाळकरासारख्या वजनदार सरदारांचे सहाय्य मिळाल्याने शहाजी व छत्रपति शिवाजीचे पुढील उद्योग विशेष सुकर झाले."[22]

जगपाळराव हा त्या काळी मातब्बर मराठा सरदार दिसतो. त्याच्याच पुढाकाराने लखोजी जाधवाने आपली मुलगी जिजाबाई शहाजीस दिली असा उल्लेख सापडतो.

"Jagpalarao Naik seems to have been a man of great influence. It was through his exerdious that the marriage of maroji's son Shahaji and Jijabai; Lukhdev Jadhavrao's daughter was brought about against the wishes of the girl's parents.[23]

जगपालराव नंतर मुधोजी दुसरा हा फलटणचा संस्थानधिपती 1630 ला झाला. व त्याने 1644 पर्यन्त राज्यकारभार केला. त्याचे व शहाजीचे संबंध चांगले होते. त्याच्याच कारकिर्दीत 1634

---

22 सरदेसाई गो.स. मराठी रियासत – पृ. 135

23 Gazetteer of Bombay Presidency Vol.XIV Satara District.P.231.

ला दहीगाव भाळवणीत शाखांचा उदय झालेला आहे. विजापूरच्या आदिलशाहाचे व मुधोजीरावाचे 1631 ला संबंध बिघडले होते. 1631 ला मुधोजीरावांना साताराच्या किल्ल्यात कैद केले होते. मुधोजी नाईक किल्ल्यात कैदेत असताना त्याने आपली धाकटी बायको व तिची मुले बजाजी व सईबाई यास त्यांच्या जीवास अपाय होईल या भितीने आपल्या जवळ सातारा येथे बोलावून घेतले. नाईक हे अटकेत अजमासे दहा वर्ष होते पुढे शहाजीराजे भोसले विजापूरचे नोकरीत राहिल्यावर आपले वजन खर्च करून महमंद आदिलशाह बादशहाचे हुकूमाने खुले झाले ( इ.स. 1838 ) मध्ये मुधोजी नाईक यांची अशारीतीने शहाजी भोसले यांच्यामुळे सूटका झाल्याने त्यांचा प्रेमभाव वाढला, त्यामुळे मुधोजी नाईक यांनी आपली मुलगी सईबाई शहाजीराजे भोसले यांचे चिरंजीव शिवाजीराजे यास देऊन लग्न विजापूरी केले. त्या लग्नात महंमद आदिलशहा याने येऊन सन्मान केला हे लग्न इ.स. 1639 च्या सुमारास विजापूरास झाले -- असावे"[24]

मुधोजीचे सहाय्य शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या उपक्रमास मिळत असावे अशी विजापूरच्या आदिलशहास शंका आली. तसेच मुधोजीच्या मनात असे होते कि फलटणचा कारभार आपल्या पश्चात बजाजीस मिळावा ह्या गोष्टीस त्याचे जेष्ठ पुत्र कबूल नव्हते परंतु मुधोजीने विजापूर दरबारची परवानगी व संमती मिळवली तेव्हा मुधोजीचे त्यांच्या दोन मुलांचे साबाजी व जगदेवराव यांचे वाकडे आले. ते विजापूरची मदत घेऊन मुधोजीवर चालून आले तेव्हा शिरवळजवळ भोळी येथे लढाई होऊन मुधोजी एका वडाच्या झाडाखाली पुतण्याच्या हातून मारला गेला त्यास बापमारीचा वड असे म्हणतात (इ.स.- 1644 )[25]

<u>बजाजीचे धर्मान्तर</u>–

बजाजी नाईक पहिले( इ.स. 1644 ते 1676 ) या लढाईत बजाजी नायकास कैद करून विजापूरास नेले. तेथे बापाचे अपराधाबदूल त्यास जीवे मारण्याची आज्ञा झाली. तेव्हा बादशहाचे सरदार माने. घाटगे, घोरपडे व काळोजी शिन्दे अदिकरून सरदारानी विनंती करून मारण्याचा हुकूम रहित करून, मुसलमान धर्म स्विकारून, आदिलशहाच्या मुलीशी बेगमाशी लग्न लावुन आपलेपाशी काही दिवस

---

24 पारसनीस ऐतिहासिक चरित्रे व टिपणे – पृ. 29

25 सि.र. तारकुंडे क्षत्रिय घराण्याचा इतिहास( पुणे 1928 )– पृ.3

ठेवून बेगमचे वतीने फलटणचे फर्मान घेऊन इ.स. 1651 मध्ये फलटणात आले. त्यास पुढे जिजाबाईने शंभु महादेवाचे देवळात शिरावर शिंगणापूर येथे प्रायश्चित देऊन परत हिंदू धर्मात घेण्यात आले. त्यानंतर शिवाजी महाराजांनी आपली कन्या सकुबाई ही बजाजीचा थोरला मुलगा महादजी यास दिली, हे लग्न पूणे येथे झाले, या लग्न संबंधामुळे शिवाजीराजे व नाईक निंबाळकर यांचे संबंधामध्ये आणखीनच दृढता निर्माण झाली"[25] व फलटणच्या पॅलेस रेकॉर्डमध्ये सुध्दा अशीच वरील प्रमाणे माहिती मिळते, म्हणून प्रत्येक प्रशासकिय रिपोर्ट मध्ये या प्रसंगाची खालील माहिती दिलेली आहे ती महत्वाची वाढते.

" Jagpalrao was succeeded by his son Mudhoji II ( 1630-1644 ) whose daughter Saibai; was married to Shivaji the Great. In 1644 Mudhoji was killed by the King of Bijapur and his son Bajaji ( 1644-1674 ) was taken prisoner to Bijapur. There he was converted to Mahomedanism by the king who gave his daughter in marriage to Bajaji as a price of the conversion. After the death of his wife; the Bijapur Princess Bajaji returned to Phaltan and was restored to his father's state in 1651. After his return Bajaji was reconverted to Hinduism mainly through the through the efforts of Shivaji the Great and his illustrious mother Jijabai ;Shivaji then gave his dauther Sakhubai in marriage to Bajaji's son Mahadaji."[26]

---

25 सि.र.तारकुंडे क्षत्रिय घराण्याचा इतिहास(पुणे 1928)–पृ. 3

26 प्रशासकिय रिपोर्ट फलटण संस्थान सन 1934–35 –पृ.3 व सरदेसाई जी.एस.न्यु हिस्ट्री ऑफ मराठा खण्ड पहिला पान क्र.37,व 104

बजाजीची मुले शिवाजी महाराज यांच्या बाजूने राहिलेले दिसतात. बजाजीचे निधन 1674 ला झाल्यानंतर त्याचा तिसरा मुलगा वणगोजी नाईक ( तिसरे) हा फलटण संस्थानचा सत्ताधिश झाला व त्याने 1676 ते 1693 राज्यकारभार केला. आणि त्यांनतर त्याचा पुतण्या जानोजी हा गादीवर आला. जनोजीला त्याचा सावत्र भाऊ बजाजी याने राज्यत्याग करण्यास भाग पाडले परंतु नंतर साता-याच्या शाहू छत्रपतीच्या मध्यस्तीने जानोंजीला परत फलटणच्या जहागिरीवर बसविण्यात आले. जानोंजी हा मुधोजीचा मुलगा असून, त्याने 1693 ते 1748 पर्यन्त संस्थानचा राज्यकारभार पाहिला. हा जानोजी छ. संभाजी, राजाराम, ताराबाई , व पुढे सातारचे शाहू महाराज यांच्या समकालीन होऊन गेला.

जानोजी नंतर त्याचा मुलगा मुधोजी(तिसरा) इ.स. 1748 ला गादीवर आला, त्याने 1765 पर्यन्त राज्यकारभार केला. त्याला संतान नव्हते म्हणून मालोजीस दत्तक घेतले. मुधोजीच्या पत्नीचे नाव सगुणाबाई असून त्या मलवडीच्या घाटगे घराण्यातील होत्या. इ.स. 1765 ला मुधोजीराव तिसरे यांचे निधन झाल्यावर त्याची राणी सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांनी काही काळ राज्यकारभार केला, त्यांचा राज्यकारभार परोपकारी व त्या दयाळु होत्या. पेशवा माधवराव व सगुणाबाई यांचे संबंध बिघडल्यामुळे पेशव्याने फौज पाठवून तिची जहागिरी जप्त केली व फलटणच्या गादीवर निंबाळकर घराण्यातील एक दुरचा नातेवाईक सोयराजी याला फलटण परगण्याचा प्रमुख बनविले. पुढे 1774 ला सगुणाबाईने मालोजी तिसरा यास दत्तक घेतले त्यावेळी पेशवा असणारा सवाई माधवराव याने या दत्तकास मंजुरी दिली व मालोजीराव तिसरे हे 1774 ला फलटण जहागिरीचे संस्थानधिपती झाले. मालोजीने फलटणची गादी मिळण्याबदृल फिरून अर्ज केला तेव्हा पेशव्याने 1 लाख रूपये घेऊन फलटणच्या गादीवर बसविले."[27]

हा मालोजी तिसरा आपल्या फौजेनिशी पेशव्याच्या हरएक लढाईत मदत करीत असत. मागे राज्यकारभार सगुणाबाई पाहात होती. मालोजी हा कर्नाटकच्या स्वारीवर गेला असता त्याचे 1777 ला निधन झाले.

<u>जानराव नाईक निंबाळकर उर्फ जानोजी दुसरा(इ.स.1777 ते 1825)</u>-

एकोणीसावा राजपुत्र तिसरा मालोजी इ.स. 1777 मध्ये मरण पावल्यानंतर त्याचा दत्तक पुत्र जानराव हा इ.स. 1777 मध्ये गादीवर आला व तो अज्ञान असल्यामुळे राणी सगुणाबाई ने इ.स. 1791 पर्यन्त संस्थानचा कारभार केला. राणी सगुणाबाई इ.स. 1791 मध्ये मरण पावली.

---

27 तरकुंडे - क्षत्रिय घराण्याचा इतिहास - पृ. 5

धर्मशीलपणा व उत्कृष्ट राज्यकारभार या गुणाबद्दल श्री सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांची ख्याती आजतागायत फलटण येथील आबालवृध्दांच्या तोंडी आहे."[28] जानराव नाईक पेशव्यास लढाईत मदत करीत असत, सगुणाबाईच्या निधनांनंतर इ.स. 1791 पासून राज्यकारभार पाहू लागला. तो इ.स. 1825 मध्ये मरण पावला.

पो.एजंटाने भेटी दिल्याचे आढळून येते. जानोजीराव दुसरा याच्या कारकिर्दीत मराठी सत्तेचा अस्त झाला . दुसरा बाजीराव यास इंग्रजांनी कैद करून कानपूर जवळ ब्रम्हावर्त आणि पेशव्याचा सर्व मुलुख एलिफिन्स्टनने आपल्या ताब्यात घेतला व जे पूर्वीचे सरदार होते त्यांच्याशी स्वतंत्र तह करून त्यांना अभयदान दिले. तसेच फलटणच्या नाईक निंबाळकरांशीही स्वतंत्र तह केला ( 22 एप्रिल 1820)"[29]

जानोजी दुसरा व इंग्रज यांचे संबंध स्नेहाचे होते.

<u>साहेबजीबाई निंबाळकर</u> ( इ.स. 1825 ते 1853 )

जानराव नाईक निंबाळकर इ.स. 1825 मध्ये मरण पावला. त्यास पुत्र नसल्यामुळे सातारच्या महाराजांनी संस्थान जप्त केले. परंतु पुढे बजाजी दुसरा यास इ.स. 1827 मध्ये 30,000 रूपये नजराना देऊन गादी देण्यात आली तो मे 1828 मध्ये मरण पावल्यानंतर पुन्हा सातारच्या महाराजांनी संस्थान जप्त केले"[30]

दरम्यान फलटणचा कारभार जानरावाची पत्नी साहेबबाई हीच पहात होती. शेवटी इ.स.1841 मध्ये साहेबबाई उर्फ बयासाहेब हिला दत्तक घेण्याची परवानगी 30,000 रूपये नजराणा देऊन मिळाली. तिने जानरावाच्या भावाचा नातु महादजी यास दत्तक घेऊन त्याचे नाव मुधोजी ठेवले व तो अज्ञान असल्यामुळे साहेबजीबाई ने उत्तमरीतीने राज्यकारभार चालविला. साहेबजीबाई ने अतिशय खडतर काळात फलटण संस्थानचा कारभार उत्तम प्रकारे केला. ती इ.स. 1853 मध्ये मृत्यु पावल्या. नंतर ब्रिटिश सरकारमध्ये संस्थानचा कारभार चालविण्यात येऊन तारीख 10-2-1860 रोजी मुधोजीराव यांना गादीचे अधिकार देण्यात आले"[31]

---

28 कित्ता-

29 Aitchiohni Treaty and engenment .

30 पटवर्धन वि.अ. संस्थानातील लोकशाहीचा लढा, पुणे 1940, -पृ.303

31 कित्ता-

फलटण संस्थान साता-याच्या छ.नी कसे जप्त केले व परत जप्ती कशी उठवली यासंबंधी फलटणच्या प्रशासकिय अहवालात पुढील महत्वाची माहिती मिळते --

" On the 1st January 1825 on Janrao's death without an heir the Jahagir was attached by the Raja of Satara but on the 3rd September 1827, Bajaji was allowed to succeed on payment of a nazarana or succession fee of Rs.30,000. On the 17th May 1828, On Bajaji's death the State was again attached by the Raja of Satara on the 3rd December 1841, on a payment of a nazarana of Rs.30,000, Janrao's widow Rani SahebjiBai alias Bayasaheb was allowed to adopt Mahadji, the grandson of Janrao's brother. After his adoption Mahadji was named Mudhoji. During his minority, Sahebji Bai acted as regent and ably administered the State till her death in 1853. After her death , the British Government administered the State till the 10th February 1860, when Mudhojirao IV alias Bapusaheb the adoptive father of the Present Ruler was invested with ruling Powers.[32]

---

32 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल-सन 1900-1901- पृ.17

असा हा फलटण संस्थानाचा मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्या पूर्वीचा प्राचीन व मध्ययुगीन कालाचा गौरवशाली इतिहास होऊन गेला . प्राचीन काळापेक्षा मध्ययुगीन काळात फलटण शहरास विशेष राजकिय महत्व प्राप्त झाले कारण तेथे नवीन मराठी संस्थान इ.स. 1284 ला उदयास आले ते 1948 पर्यन्त अस्तित्वात राहिले. फलटणच्या नाईक निंबाळकरने दिल्ली चा सुलतान महमंद तुघलक , बहामणी सत्ताधीश , विजापूरची आदिलशाही, शिवाजी महाराज व पेशवे यांच्या पदरी इनामे-इतमाने सेवा करून गौरवशाली इतिहास घडविला . मध्ययुगीन काळात फलटण चे निंबाळकर हे एक प्रतिष्ठित सरदार होते म्हणूनच त्यांच्या घराण्याशी व मातब्बर मालोजी, शिवाजी, यांच्या घराण्याशी वैवाहिक संबंध घडून आलेले दिसतात.

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात पेशवाईची सत्ता दुस-या बाजीरावाकडे गेली आणि 1818 ला मराठी सत्तेचा नाश झाला. 1818 नंतर संपूर्ण भारतात व महाराष्ट्रात इग्रंजी सत्ता दृढमुल झाली. महाराष्ट्रातील जी अठरा संस्थाने 1820 ला एस.एम.सी. स्टेट म्हणून संबोधण्यात आली, त्यामध्ये फलटण एक संस्थान बनले. 1820 नंतर फलटण संस्थान ईस्ट इंडिया कंपनीचे मांडलीक संस्थान सातारा छत्रपतिच्या अधिपत्याखाली आले. सातारच्या छत्रपतीने योग्य वारस नसल्याने दोन वेळा फलटण चे संस्थान जप्त केले व शेवटी मुधोजीरावाचा दत्तक मजूंर करून 1860 ला फलटण संस्थानाचा नवीन कालखंड उदयास आला.

1857 च्या बंडामुळे भारतातील राजकीय परिस्थिति अस्थिर झाली होती .ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात येऊन भारताची सत्ता ब्रिटिश राजा ने आपल्या हातात घेतली होती याचा परिणाम भारतीय संस्थानीकावर झाला होता. 1860 ला अशा या राजकिय,आर्थिक , अस्थिरतेच्या काळात मुधोजीराव फलटण चे सत्ताधीश झाले त्याने 1916 पर्यन्त संस्थानचा राज्यकारभार करून फलटणची सर्वांगीण प्रगती करून एक आदर्श संस्थान कसे बनविले त्याचा सविस्तर वृत्तांत मी दुस-या प्रकाणात देत आहे.